# भारताचा शाश्वत विकास आणि शिक्षण : एक अभ्यास

**प्रा.डॉ. मुरुडकर एम.एस.**
भूगोल विभाग
अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, जळकोट, ता. जळकोट,जि.लातूर
Email- murudkarsudhakar078@gmail.com
**मो. नो. 9923789857**

**प्रस्तावना :-**

देशाच्या आर्थिक विकासात शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, वाहतूक, दळण-वळण इत्यादीची आवश्यकता असते. भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक विकास साधण्यासाठी वरील घटकांना म्हत्वाचे स्थान प्राप्त होते.

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे. भारताचा आर्थिक विकास साधण्यासाठी दरडोई उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. दरडोई उत्पादन वाढवण्यासाठी औद्योगिकरण व कृषी क्षेत्र बाजारपेठा व व्यापार यामध्ये कुशल कामगार असणे आवश्यक आहे. याकरिता शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. भारतातील बहुसंख्य लोक हे शेती व्यावसायावर अवलंबून आहेत. त्यांना योग्य पद्धतीचे शिक्षण देऊन प्रशिक्षित केल्यामुळे उद्योग धंदे व कृषीक्षेत्राला प्रत्यक्षरित्या फायदा होवून आर्थिक विकासात वाढ होवून भारतासारख्या विकसनशील देशाच्या विकासात शिक्षणाला महत्व प्राप्त झाले आहे.

ज्या सेवा-सुविधा अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देतात. त्या सर्वांचा समावेश पायाभूत संकल्पना या संकल्पनेत होतो. सर्वसामान्य लोकांचे जीवन सुखी होण्यासाठी देखील या सेवा सुविधांचा उपयोग होतो. जसे कि, शेती क्षेत्राचा विकास, जलसिंचनाच्या सोई, सुलभ कर्जाच्या सोयी, इत्यादी. गोष्टीवर अवलंबून असतो. उद्योग क्षेत्राचा विकास, रस्ते, विपुरवठा, बँकेच्या सोयी उत्तम संपर्क माध्यमाच्या सोयी यावर अवलंबून असतो. दोन्हीही क्षेत्राच्या विकासासाठी आरोग्यविषयक सोयी, रस्ते, पिण्यायोग्य पाणी या गोष्टींची आवश्यकता असते. वरील क्षेत्राच्या विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. या सर्व सेवांना मिळून, अर्थव्यावास्थेंची पायाभूत संरचना असे म्हणतात. म्हणून शिक्षण हि पायाभूत सेवा अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून शोधप्रबंधात भारतातील शाश्वत विकास आणि शिक्षण यांचा अभ्यास केला आहे.

**उदिष्ट्ये :-**


1) भारतातील आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्व अभ्यासणे.
2) शिक्षण विषयक यंत्रणेचा अभ्यास करणे.
3) शिक्षणाबाबत राबविण्यात येणार्यां योजनांचा आढावा घेणे.

**तक्ता क्र. १ :-**भारतातील इ.स. १९५१ ते २०११ वर्षातील साक्षरतेचे प्रमाण खालील प्रमाणे दिसून येते. (साक्षरता टक्केवारीत)

 Copyright © 2020 Authors

Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

| वर्ष | पुरुष साक्षरता | स्त्री साक्षरता | एकूण साक्षरता |
|---|---|---|---|
| १९५१ | ७.९३ | २४.९५ | १६.६७ |
| १९६१ | १२.९५ | ३४.४४ | २४.२ |
| १९७१ | ३९.४५ | १८.६९ | ३४.५ |
| १९८१ | ६६.५० | २९.८५ | ४३.७ |
| १९९१ | ६४.१३ | ३९.२९ | ५२.२ |
| २००१ | ७५.८५ | ५४.१६ | ६४.८ |
| २०११ | ८२.१४ | ६५.४६ | ७४.०४ |




भारतीय अर्थव्यवस्था हि कृषिप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते. शेती उद्योग, बाजार व्यापार इत्यादीचा विकास होण्यासाठी शिक्षणाची अवशकता असते. उत्पादन केंद्र व बाजार पेठ जोडल्या जातात. आज शिक्षण व तंत्रज्ञानाच्या जोरावर मानव प्रत्येक क्षेत्रात महत्वाचा स्त्रोत म्हणजे मानव संसाधन होय. मनुष्य यंत्र सामग्री पद्धती, पैसा, आणि वस्तू या पाच संसाधनाची देशाच्या विकासासाठी गरज असते. त्यापैकी मानव संसाधन सर्वात म्हत्वाचे आहे. मानवाला फक्त अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजा मिळाल्याम्हणजे त्यांचा सर्वांगीण विकास झाला असे नाही तर शिक्षण अतिशय महत्वाची गरज मानली जाते. कारण शिक्षाणाच्या आधारे मानवाला त्याच्या बौद्धिक कौशल्याचा वापर करून स्वत:चा व देशाचा विकास घडवून आणण्यास मदत होते. लोकांना शिक्षण मिळावे यासाठी महर्षी कर्वे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी आदींनी लोकांना महत्व पटवून देवून शिक्षण सर्वांना मिळावे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले आहेत. सध्या शासन देखील देशातील साक्षरतेचे प्रमाण वाध्व्यांसाठी सतत वेगवेगळे उपक्रम अभियान राबवित आले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्वरूपात शिक्षणाकरिता शिष्यवृत्या दिल्या जात आहेत.


Copyright © 2020 Authors

आदिवाशी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता निवास व भोजनाची सोय केली जात आहे. आपल्या देशाला आवश्यक असणारी यंत्र सामुग्री बाहेर देशातून आयात करावी लागत आहे. ती यंत्र सामुग्री भारतातच तयार करता यावी म्हणून नव-नवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यात येत आहे. ते आपल्याला वरिल तक्त्यावरून दिसून येते.

वरिल तक्त्यात भारतातील साक्षरतेचा प्रमाणाचा अभ्यास केला असता इ.स. १९५१ ला पुरुष साक्षरतेचे प्रमाण ७.९३ % तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण २४.९५% आहे तर एकूण साक्षरतेचे प्रमाण १६.६७% असलेले दिसून येते. तेच प्रमाण इ.स. २०११ ला पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८२.१४% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६५.४६% आहे तर एकूण साक्षरतेचे प्रमाण ७४.०४% असलेले दिसून येते. इ.स. १९५१ ते २०११ पर्यंत शिक्षणाच्या प्रमाणात झालेली वाढ हि दिवसें-दिवस भारताच्या आर्थिक विकासात वाढ झालेली आढळते. कारण आर्थिक विकासात मुलभूत गरज म्हणून शिक्षणाकडे पाहिले जात आहे. एखाद्या देशाची प्रग्रती आणि उत्पादकतेचा एक घटक म्हणजे देशातील नागरिकांना शिक्षण चांगल्या प्रकारचे देणे आणि देशाचा शाश्वत विकास करणे हेच ध्येय असले पाहिजे.

**सारांश :-**

भारतातील शाश्वत विकासाचा विचार करताना येथील अर्थव्यवस्था आणि जनता यांचा दरडोई उत्पनाचा विचार करताना येथील शिक्षण क्षेत्रामध्ये निराशाजनक परिस्थिती दिसून येते. आजही सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणाबाबत फारसे गांभीर्याचे लक्ष केले नाही. आर्थिक सुधारणा बरोबरच जागतिक व्यापारामध्ये आपण मोठ्या प्रमाणात सुधारणा केली आहे. परंतु शिक्षण क्षेत्रात नवनवीन शिक्षण पद्धतीचा विकास झाला नाही. शाश्वत विकास सध्या करायचा असेल तर सर्वसामान्य जनतेला शिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. देशातील शिक्षण संपन्न मनुष्य बळावरच शाश्वत विकास अवलंबून आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा. दत्ता सुंदरम एसचंद अँन्ड कंपनी दिल्ली
2) आर्थिक भूगोल- डॉ. विठ्ठल घारपूरे.
3) ग्रामीण अर्थशास्त्र – प्रा. डॉ. सोमवंशी मनोज कुमार- अरुणा प्रकाशन लातूर
4) लोकराज्य- सप्टेंबर ते ऑक्टोबर २०११.

 Copyright ⓒ 2020 Authors